# ई - पोलीस पत्रिका

दिनांक २१/११/२०२४ अनु.क्र. २११

**(अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)**

- **नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.**
- **उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.**
- **महीला, मुले व जेष्ठ नागरिकांची सुरक्षा.**
- **जातीय सलोखा वाढविणे.**
- **संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरुध्द कठोर कारवाई.**
- **रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.**
- **पोलीस कोठडीत गुन्हे घडु न देणे.**
- **आरोपी पोलीसांचे ताब्यातुन पळुन जाऊ नयेत.**
- **" सुरक्षित व सुखकर अमरावती " हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातुन साध्य करु.**

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

### रजा

**१.पोआअ/पशा-३/अर्जित रजा मंजुरी/९८६०/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/११/२०२४**

## आदेश

पोलीस आयुक्त, अमरावती शहर या आस्थापनेवरील खालील नमुद मंत्रालयीनकर्मचारी यांचे नावासमोर दर्शविल्या प्रमाणे महाराष्ट्र नागरी सेवा, (रजा) नियम १९८१ मधील ५० अन्वये **अर्जीत रजा** मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव व पदनाम | नेमणुक | अर्जीत रजा कालावधी व कारण | अतिरीक्त कार्यभार |
|---|---|---|---|---|
| **१** | श्री. राजु महात्मे, वरिष्ठश्रेणी लिपीक | पत्रव्यवहार शाखा | दि.१८/११/२०२४ ते दि.२२/११/२०२४ **एकुण ०५ दिवस** मुख्यालयसोडण्याचे परवागीसह **पुतनीचे लग्न करीता** | श्रीमती शितल भगत ,वरिष्ठश्रेणी लिपीक |

**२.पोआअ/आस्था-५/कर्करोग रजा/९८८४/२०२४ अमरावती शहर दिनांक १८/११/२०२४**

## आदेश

खालील नमुद पोलीस अंमलदार यांना कर्करोग हा आजार असल्याने त्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली असुन वैद्यकीय मंडळाने दिलेल्या प्रमाणपत्रानुसार त्यांचा रुग्ननिवेदन कालावधी **म.ना.से. (रजा) नियम १९८१ मधील परिशिष्ट- तीन मधील नियम ३ (३) तरतुदी नुसार** खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र | पदनाम/ब.क्र./नाव | नेमणुक | रुग्णनिवेदन कालावधी व मंजुर रजा |
|---|---|---|---|
| १. | पोहवा/५२७, विलास खांडेकर | शवाशा पश्चिम | दि.२६/०९/२०२३ ते दि.१८/०२/२०२४ पर्यंत **१४६** दिवस परिवर्तीत रजा**(रजा नियम ६१ नुसार)**<br>दि. १९/०२/२०२४ ते दि. १३/०३/२०२४ पर्यत **२४** दिवस अर्जित रजा**(रजा नियम ५० नुसार)** |

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

### शिक्षा

**१.पोआअ/विचौ/निलंबन कालावधी/निर्वाह भत्ता/९७८२/२०२४ अमरावती शहर दि. १२/११/२०२४**

### आदेश

खालील नमुद निलंबीत अधिकारी व कर्मचारी यांना निलंबनामध्ये मुख्यालयी उपस्थित राहून दैनंदिनहजेरी लावण्याचे निर्बध निलंबन आदेशामध्ये घालण्यात आलेहोते. तरीसुध्दा निलंबीत अधिकारी व कर्मचारीहे दैनंदिनहजेरी न लावता व वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता परस्पर त्यांच्या नावासमोर दर्शविलेले दिवस गैरहजर राहील्यामुळेत्यांनी निलंबन आदेशात निर्धारीत केलेल्या शर्तीचा भंग केलेला आहे. त्यामुळे त्यांचा निलंबनाच्या मुख्यालयीहजर असलेल्या दिवसाचा निर्वाह भत्ता अ.क्रं. १ यांना म.ना.से. (निलंबन, बडतर्फी इत्यादी) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) (ए) तरतूदीनूसार मंजूरकरण्यांत येत आहेतसेच अ.क्रं. २ मधील निलंबित अंमलदारहे निलंबनाधिन काळात दिनांक ०२/०६/२०२३ पासून मुख्यालयीगैरहजर आहे. त्यामुळे त्यांना महाराष्ट्र नागरी सेवा (निलंबन, बडतर्फी इत्यादी) नियम १९८१ मधील नियम ६८ (१) अन्वये कोणतेही प्रदानकेले जाणार नाही त्यांचा निलंबन कालावधी मधील निर्वाह भत्त्यावरील हक्कत्यांनी गमावलेला आहे.

| **अ. क्र** | **पो.अधि./अंमलदार यांचे नाव पदनाम/ ब.नं.** | **निलंबन दिनांक** | **कालावधी** | **निलंबित मुख्यालयीहजर/ गैरहजर माहिती** | | **शेरा** |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **हजर दिवस** | **गैरहजर दिवस** | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पोना/१०५९ सागर निचळे, नेमणूक पो.स्टे. राजापेठ | १७/५/२०२४ | दि.१/१०/२०२४ ते दि.३१/१०/२०२४ | २४ | ०७ | -- |
| २ | पोशि/१६९१ विशाल गजभिये, नेमणूक पो.स्टे. नागपूरीगेट | ०२/०६/२०२३ | दि.१/१०/२०२४ ते दि.३१/१०/२०२४ | -- | ३१ | -- |

**२.पोआअ/विचौ-१/नि.का.अं.आ./पोउपनि-मोहन केवटी/९८३१/२०२४ अमरावती शहर दि. १४/११/२०२४**

**संदर्भ:-** १) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन/पोउपनि श्री केवटी+२/५८०६/२०२४, दि. २१/०६/२०२४
२) क्र.पोआअ/विचौ-१/निलंबनमुक्त/पोउपनि-केवटी+२/६७८४/२०२४ दि.२६/०७/२०२४

**विषय** :-निलंबन कालावधी निश्चित करणे बाबत.

--ooo--

उपरोक्त संदर्भान्कीत विषयान्वये श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, पोलीस स्टेशन गाडगेनगर येथे नेमणूकीस असतांना दिनांक १५/०६/२०२४ रोजी अर्जदार श्रीमती शितल चंद्रबहादूर थापा यांनी त्यांचे विरुध्द कोणताही गुन्हा दाखल नसतांना पो.स्टे. ला आणून मारहान केल्याबाबत कार्यालयास तक्रार अर्ज सादर केल्याने, त्यांना या कार्यालयाचे आदेश क्र.पोआअ/विचौ-१/निलंबन/पोउपनि श्री केवटी+२/ ५८०६/२०२४, दि. २१/०६/२०२४ अन्वये निलंबीत करण्यांत आले होते. तसेच या कार्यालयाचे आदेश क्र. पोआअ/विचौ-१/ निलंबनमुक्त/ पोउपनि-केवटी + २/६७८४/२०२४ दि.२६/०७/२०२४अन्वये निलंबनातून मुक्त करण्यांत आले आहे.

## आदेश

श्री मोहन पुंजाराम केवटी, पोलीस उपनिरीक्षक, नेमणूक नियंत्रण कक्ष, अमरावती शहर यांचामहाराष्ट्र नागरी सेवा (पदग्रहण अवधी, स्वीयोत्तर सेवा आणि निलंबन, बडतर्फी व सेवेतुन काढुन टाकणे यांच्या काळातील प्रदाने) नियम १९८१ मधील ७२ (१) (बी) नुसार दिनांक २१/०६/२०२४ पासून ते दिनांक २६/०७/२०२४ पावेतो निलंबन कालावधी हा **"जसाचे तसा"(As Such)** करण्यात येत आहे.

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## वेतन निश्चिती

**१.पोआअ/आस्था-वेनिलि/१ जुलै काल्प.वे.वाढ/९७१९/२०२४ अमरावती शहर दिनांक ०८/११/२०२४**

## आदेश

शासन परिपत्रक वित्त विभाग क्र.वेतन-२०२३/प्र.क्र.१३/सेवा-३, दिनांक २८.०६.२०२३ अन्वये जे पोलीस अधिकारी/अंमलदार दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेले आहेत व ज्यांनी मागील १२ महिन्यांची आर्हताकारी सेवा पुर्ण केली आहे, अशा सर्व सेवानिवृत्त पोलीस अधिकारी/अंमलदारांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक (Notional) वेतनवाढ विचारात घेऊन त्यांचे सेवानिवृत्ती वेतन व इतर सेवानिवृत्तीविषयक लाभ सुधारीत करण्यात यावेत; तसेच सदर लाभ सुधारीत करण्यात आल्यानंतर सदर कर्मचा-यांनी अर्ज दाखल केलेल्या दिनांकाच्या मागील ०३ वर्षाची थकबाकी अथवा त्यांच्या सेवानिवृत्तीचा दिनांक यापैकी जे कमी असेल तितकी थकबाकी देण्यात यावी; अशा सुचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर शासन परिपत्रकानुसार या कार्यालयाच्या आस्थापनेवरील दिनांक ३० जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या सोबतच्या विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांना दिनांक ०१ जुलै रोजीची काल्पनिक वेतनवाढ मंजूर करण्यात येत आहे. तसेच दिनांक ०१ जुलैच्या काल्पनिक वेतनवाढीसह सदर विवरणपत्रात नमूद पोलीस अंमलदार यांचे नावासमोरील **स्तंभ क्र.०७** मध्ये नमूद केलेले वेतन विचारात घेऊन त्यानुसार सेवानिवृत्तीवेतन,सेवानिवृत्ती उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण सुधारीत करण्यात यावे. सुधारीत सेवानिवृत्तीवेतनाच्या थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी विवरणपत्रात **स्तंभ क्र.०९** मध्ये नमूद करण्यात आला आहे. त्यानुसार सदर कालावधीत सेवानिवृत्तीवेतनाच्या फरकाची थकबाकी अदा करण्यात यावी.

सदर काल्पनिक वेतनवाढीनुसार सुधारीत केलेल्या सेवानिवृत्तीवेतन उपदान,रजा रोखीकरण आणि सेवानिवृत्तीवेतनाचे अंशराशीकरण या सेवानिवृत्तीवेतनविषयक लाभांच्या फरकाची थकबाकी यापूर्वी अदा करण्यात आलेल्या रकमेशी समायोजीत करुन अदा करण्यात यावी.

## विवरणपत्र

दिनांक 30 जून रोजी सेवानिवृत्त झालेल्या पोलीस अंमलदार यांना दिनांक 01 जुलै रोजीची काल्पनिक (NOTIONAL) वेतनवाढ मंजूर करणे बाबत.

| **अ.क्र.** | **पदनाम व बक्कल क्रमांक** | **दि. 30 जून रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त पोलीस अंमलदाराचे नाव** | **सेवानिवृत्तीचा दिनांक** | **सेवानिवृत्तीच्या दिनांकाची वेतनश्रेणी** | **सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन** | **दि.01 जुलै रोजीच्या काल्पनिक वेतनवाढीनंतर सेवानिवृत्तीच्या दिनांकाचे वेतन** | **अर्ज सादर केल्याचा दिनांक** | **सुधारीत सेवानिवृत्तीवेतनाची थकबाकी अनुज्ञेयतेचा कालावधी** |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 1. | से.नि. सपोउपनि /102 | हरिगोविंद श्रीरामजी पोजगे | 30.06.2007 | रु.5200-20200 ग्रेड पे 2800/- | वेतन रु.13020/- + ग्रेड पे रु.2800/- एकुण वेतन रु. रु.15820/- | वेतन रु.13500/- + ग्रेड पे रु.2800/ एकुण वेतन रु. रु.16300/- | **दि. 08.08. 2023** | **दि.08.08.2020 ते 07.08.2023** |

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस